साप्रवि/गट-८(र.व का.)/सा.आ./
११७ (क) /म.भत्ता/न.क्र.५६९/
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,
ऐस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
प्लॉट क्र.१,तळ मजला, धारावी रोड,
माटुंगा, मुंबई - ४०० ०१९.

## सुधारपत्र क्रमांक २७ दिनांक ०९/०९/१९९९
## (सर्वसाधारण आदेश क्र.११७ (क) दिनांक ३१ मार्च, १९८६ करिता)

**विषय** :-महाराष्ट्र राज्य विद्युत् मंडळाच्या कर्मचाऱ्यांना दि.१ जानेवारी१९९९ पासून पुढे द्यावयाच्या महागाई भत्त्याचे सुधारित दर.

**संदर्भ** :-सर्वसाधारण आदेश क्र. ११७ (क) दि.३१ मार्च, १९८६ चे सुधारपत्र क्र. २६ दिनांक ०५/१०/१९९८.

महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय एफ.डी.क्रमांक मभवा-१९९९/१६/सेवा-१०, दि.७ सप्टेंबर,१९९९ अन्वये दिनांक १ जानेवारी, १९९९ पासून शासनाच्या सर्व कर्मचाऱ्यांना अखिल भारतीय ग्राहक सरासरी निर्देशांक १९६०-१०० या मालिके ऐवजी १९८२-१०० या मालिकेतील निर्देशांक वाढीनुसार महागाई भत्ता मंजूर केला. महाराष्ट्र राज्य विद्युत् मंडळाच्या कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता देण्याच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य विद्युत् मंडळ शासनाच्या आदेशांचे पालन करते. तथापि मंडळातील कर्मचाऱ्यांचे दि.१.४.९८ पासूनची सुधारित वेतन निश्चिती झाली नसल्याने,मंडळाने ठराव क्र. ४७१ दि. ३१ ऑगष्ट, १९९९ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारात,अध्यक्षांनी सचिव,तांत्रिक सदस्य (पा.व वि.),तांत्रिक सदस्य (नि) व लेखा सदस्य यांच्याशी विचारविनिमय करुन मंडळातील कर्मचाऱ्यांना अखिल भारतीय ग्राहक सरासरी निर्देशांक १९६०-१०० आधारित निर्देशांकाच्या वाढीनुसार खाली निर्देशिलेल्या महागाई भत्त्याच्या सुधारित दरांस मान्यता दिली आहे.

| सुधारित महागाई भत्ता लागू झाल्याची तारीख | असुधारित वेतनश्रेणीतील मूळ वेतन | महागाई भत्त्याचे मासिक सुधारित दर |
|---|---|---|
| १ जानेवारी,१९९९ | १ )रु.३,५००/-पर्यंत | २२८/- टक्के |
| | २ )रु.३,५०१/- ते रु.६,०००/- पर्यंत | मूळ वेतनाच्या १७०/- टक्के परंतु किमान रु.७९८०/- |
| | ३ )रु.६,०००/- हून अधिक. | मूळ वेतनाच्या १४७/-टक्के परंतु किमान रु.१०२००/- |

....२/-

२)दि. १ जानेवारी, १९९९ पासून पुढे सुधारित दराने लागू होणाऱ्या महागाई भत्त्याच्या रकमेची गणना करताना असुधारित वेतनश्रेणीतील केवळ मूळ वेतन हिशोबात घ्यावे. "वेतन" अशी व्याख्या करण्यात येणारे विशेष वेतन, प्रतिनियुक्ती भत्ता, विशेष पूरक भत्ता, हेवी डयूटी भत्ता (अवजड वाहन भत्ता)इत्यादी भत्ते महागाई भत्त्याचा विचार करताना हिशोबात धरु नयेत.

३)महागाई भत्त्याच्या रकमेचे प्रदान करताना ५० पैसे किंवा त्याहून अधिक पैशात येणारी रक्कम पुढच्या रुपयाशी पुर्णांकित करण्यात यावी व ५० पैशांहून कमी येणारी रक्कम दुर्लक्षित करावी.

४)उपदान, अतिकालीक भत्ता, सर्वसाधारण आदेश क्र. ५९ (क) दिनांक २७ जून, १९७० च्या तरतूदीअंतर्गत रजेचे रोखीकरण, सेवाविनियम क्र. ३९(क), आणि सर्वसाधारण आदेश क्रमांक ११४ (क) दिनांक २३ ऑगस्ट, १९८२ च्या प्रयोजनास्तव, तसेच वेतन व महागाई भत्त्यावर अवलंबून असलेले अन्य कोणतेही प्रदान/वसुली या प्रयोजनास्तव या सुधारपत्राद्वारे लागू होणारा सुधारित दराचा महागाई भत्ता विचारात घ्यावा.

५)सुधारित दरानुसार महागाई भत्त्याचे प्रदान मंडळाच्या सर्व कर्मचाऱ्यांना सप्टेंबर, १९९९ च्या वेतनापासून सुरु करावे.

६)आणखी असे की, महागाई भत्त्यामध्ये झालेल्या वाढीमुळे १ जानेवारी, १९९९ ते ऑगष्ट, १९९९ या ८ महिन्यांची निव्वळ देय थकबाकीची ५०% रक्कम सप्टेंबर १९९९ मध्ये, २५% ऑक्टोबर १९९९ मध्ये व उर्वरीत २५% नोव्हेंबर १९९९ मध्ये रोख स्वरुपात देण्यात यावी.

७)१ जानेवारी,१९९९ रोजी किंवा त्यानंतर एका कार्यालयातून दुसऱ्या कार्यालयात बदली झालेल्या कर्मचाऱ्यांना १ जानेवारी, १९९९ पासून जुन्या कार्यालयातून मुक्त केल्याच्या तारखेपर्यंतची सुधारित दराने द्यावयाची महागाई भत्त्याची थकबाकीची रक्कम देताना १ सप्टेंबर, १९९९ रोजी ते ज्या कार्यालयात काम करीत आहेत त्या कार्यालयाने द्यावी. १ सप्टेंबर, १९९९ पूर्वी बदलीच्या ठिकाणी हजर होण्याकरिता कार्यमुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची थकबाकी बदली झालेल्या ठिकाणीच देण्यात यावी.

८)संबंधित अधिका-यांना विनंती करण्यांत येते की, त्यांनी महागाई भत्त्याच्या थकबाकी प्रदानासाठी आवश्यक असलेल्या निधीची मागणी श्री.एम.पी.बढीये, सह मुख्य लेखा अधिकारी (अर्थोपाय विभाग), हाँगकाँग बँक बिल्डींग, ४था माळा, मुंबई-४०० ०२३ यांच्याकडे त्वरीत करावी.

हे आदेश कार्यव्ययी आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांनाही लागू होतील.

( एस्.एस्.जोशी )
संचालक (कर्मचारीवर्ग)

प्रत,
प्रेषण यादीप्रमाणे कार्यकारी अभियंता, तत्सम व त्यावरील अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांच्या माहितीसाठी.